# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 17/04/2021 (शनिवार)
(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर चौरेपठार भिमनगर हत्तीखाना काटोल येथे दिनांक 11/04/2021 चे 10.00 वा. दरम्यान लक्ष्मण चंद्रभान गजभिये (मृतक) वय 74 वर्ष रा. भिमनगर हत्तीखना काटोल हे सकाळी आंबा खात असतांना आंब्याची कोइ त्यांचे घश्यात जावुन अडकली. त्यामुळे श्वासोच्छवास घेण्यास त्रास झाल्याने त्यांना उपचाराकरिता ग्रामीण रूग्णालय काटोल येथे नेले व तेथुन मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता उपचारादरम्यान त्यांचा मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शुभम लक्ष्मणराव गजभिये वय 26 वर्ष रा. भिमनगर हत्तीखाना काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अरूण भेंडे 9923193642 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर गुमथळा शिवारातील शेतात येथे दिनांक 15/04/2021 चे 11.30 वा. दरम्यान विठोबा निंबाजी मानकर (मृतक) वय 65 वर्षे रा. गायकवाड ले आउट ब्राम्हणी हे त्यांच्या शेतात गेले असता सायकांळी परत न आल्याने फिर्यादीने पो.स्टे. कळमेश्वर ला माहिती दिल्याने पोस्टे ला मिसिंग क. 36/21 अन्वये मिसिंग बाबत नोंद घेतली. फिर्यादी हे दि. 06/04/2021 रोजी सायंकाळी 06.30 वा. शेतात गेले असता त्यांना शेताजवळील तलावाचा पाण्यात बुडुन विठोबा मानकर मृत अवस्थेत मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शुभम विठोबा मानकर, वय 26 वर्षे, रा. शिक्षक कॉलनी कळमेश्वर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ राजेंद्र पाली 9284354630 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर